सी.एन.आर.नं.एमएचएसआय —०७—०००००४—२०१८

**संक्षिप्त फौजदारी खटला क्र. ०१/२०१८**

**निशाणी —**

**मालवण येथील न्यायदंडाधिकारी वर्ग — १ यांचे न्यायालय**

**आरोपीचे प्रकथन**

१. अपराध घडल्याचा दिनांक : ०२/०१/२०१८
२. अहवालाचा /फिर्याद दिनांक : ०४/०१/२०१८
३. फिर्यादीचे नांव, वय व पत्ता : सरकारतर्फे विनायक विष्णू साटम,
वय —५५ वर्षे, पो.हे.कॉ.ब.क्र. ६७७
नेमणूक — आचरा पोलीस ठाणे.
४. आरोपीचे नांव, वय व पत्ता : जेम्स रेमेत ब्रिटो, वय ४५ वर्षे,
रा. मु.पो. मालवण मेढा, ता. मालवण,
जि. सिंधुदुर्ग

५. अपराधाचा तपशील :—

दिनांक ०२/०१/२०१८ रोजी १५.०० वाजण्याच्या सुमारास गावमौजे आचरा येथे आचरा तिठा ते कणकवली जाणा—या सार्वजनिक रस्त्यावर, गुडलक मोबाईल शॉपी समोर, ता. मालवण, जि. सिंधुदुर्ग येथे तुम्ही आपल्या ताब्यातील डंपर क्र. के.अे./५१/बी./८९८७ हा वाहतुकीस अगर कोणत्याही व्यक्तिस अगर वाहनांना अडथळा होवून धोका निर्माण होईल असा लावलेला मिळून आलात व त्याव्दारे तुम्ही भारतीय दंड विधान कलम २८३ अन्वये शिक्षापात्र असलेला व या न्यायालयाच्या दखलगीरीत येणारा गुन्हा केला.

६. आरोपीचे प्रतिकथन :—

प्रश्न १: तुम्हाला फिर्याद व फिर्यादी पक्षाच्या कागदांच्या नकला मिळाल्या काय?
उत्तर : होय.
प्रश्न २: तुम्हाला अपराधाचा मजकुर समजला काय ?
उत्तर : होय.
प्रश्न ३: तुम्हाला गुन्हा कबूल आहे काय ?
उत्तर : होय, मला कबुल आहे.

————————————

आरोपीची स्वाक्षरी समक्ष,

दिनांक : ०४ जानेवारी, २०१८

(आर.आर.काळे)
न्यायदंडाधिकारी वर्ग—१, मालवण

## न्यायनिर्णय
## ( दिनांक ४ जानेवारी २०१८ रोजी घोषित )

आज रोजी आरोपीला न्यायालयासमोर हजर केले. आरोपीने त्याला सदरचा तोहमत आरोप कबूल असल्याबाबत अर्ज दिलेला आहे. त्याच अनुषंगाने आरोपीला त्याच्यावरील आरोपांचा तपशील समजावून सांगितला असता आरोपीने त्याला त्याच्या वरील गुन्हा मान्य असल्याचे सांगितले. आरोपी याची सदरची कबूली ही स्वेच्छेची असल्याने ती स्वीकारण्यात आली. आरोपीस शिक्षेबाबत काही सांगावयाचे आहे काय, अशी विचारणा केली असता आरोपीने सदरचा त्याचा पहिलाच अपराध आहे, असे सांगून शिक्षेबाबत सौम्य दृष्टिकोन ठेवण्यात यावा, असे सांगितले. सहा. सरकारी वकिलांनी आरोपीस जास्तीत जास्त दंड करण्यात यावा असे सांगितले. आरोपी विरूध्दचा सदरचा अपराध हा पहिलाच अपराध असल्याचे अभिलेखावरून दिसून येते. आरोपीवरील हा प्रथमच अपराध आहे, ही गोष्ट लक्षात घेता दंड करणे योग्य होईल. म्हणुन खालीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येतो.

## आदेश

१. आरोपी नामे जेम्स रेमेत ब्रिटो, वय ४५ वर्षे, रा. मु.पो. मालवण मेढा, ता. मालवण, जि. सिंधुदुर्ग यास फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २५२ अन्वये त्याचेविरूध्द भारतीय दंड विधान कलम २८३ अन्वये तोहमत प्रमाणे शिक्षापात्र अपराधाबाबत दोषी धरण्यात येत आहे.

२. आरोपी याला भारतीय दंड विधान कलम २८३ अन्वये केलेल्या अपराधाबाबत रक्कम रुपये २००/— च्या द्रव्यदंडाची शिक्षा देण्यात येत आहे.

३. सदर न्यायनिर्णयाची मोफत प्रत आरोपीस देण्याची आहे.

सदरचे निकालपत्र लघुलेखकास खुल्या न्यायालयात तोंडी सांगून खुल्या न्यायालयात जाहीर करण्यात आले.

सही/—
(आर.आर.काळे)
न्यायदंडाधिकारी वर्ग—१, मालवण

दिनांक : ०४ जानेवारी, २०१८